माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३८७७ / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संदीप रामचंद्र कडाळे | मुख्याध्यापक, दादा जाधवराव विद्यालय जुनी जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे | शिक्षणाधिकारी, माध्यमिक पुणे जिल्हा परिषद पुणे |

**( सुनावणी दिनांक - १७ / ११ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २७.०६.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " आदेश होवूनही माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ०५.०२.२०२४ | विद्यालय स्थापन झाल्यापासून ते सन २०२३-२४ पर्यंत सर्व कर्मचारी व अधिकारी यांची नावानिशी यादी, त्यांची संख्या, त्यासंबधीत शासन निर्णय, हजेरी रजिस्टर, जॉईनिंग लेटर व इतर माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, " जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, प्रथम अपिलीय आदेश होऊनही माहिती दिली नाही. "

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, " अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि.०४.०३.२०२४ रोजीच्या पत्राने उत्तर देवून जी माहिती वैयक्तिक स्वरुपाची माहिती आहे, ती नाकारली

आहे. तसेच कर्मचाऱ्यांची संख्या कळविले आहे. काही माहिती ही महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या संकेत स्थळावर असल्याबाबत कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन आदेश पारित केले आहे. ”

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०४.०३.२०२४ रोजीच्या पत्राने उत्तर दिले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३८७७ / २०२४ / पुणे 10862 दिनांक - 11/12/2025